नि. फौ. ख. क्र. १८९/२०२५

सरकार वि. कल्पेश सुभाष कोकणी

निशाणी क्र. ११ /क

## दोषारोप

मी **धनंजय एस. देवरे**, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २, नवापूर यांचे न्यायालयात तुम्ही आरोपी;

कल्पेश सुभाष कोकणी,

वय – २४ वर्षे,

रा. हरणीपाडा, पो. मोग्राणी, ता. नवापुर, जि. नंदुरबार.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप निश्चित करतो;**

पहिले असे की, तुम्ही दिनांक १३.०३.२०२५ रोजी दुपारी ४.३० वाजेचे सुमारास विसरवाडी ते कडवान रोडवर मौजे लहान कडवान गावचे दुधडेअरी जवळ रोडवर सार्वजनिक जागी तुमचे ताब्यातील मोटारसायकल क्र. जी.जे.१९/बी.एफ.-४४८८ हे वाहन लापरवाहीने, निष्काळजीपणाने व रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन मोठे कडवानकडे जाणारी मोटारसायकल क्र. एम.एच.३९/ए.के.-९०४४ हिला ठोस मारली, ज्यामुळे मानवाचे जिवीतास धोका निर्माण होईल किंवा ज्यामुळे अन्य कोणत्याही व्यक्तीस जखम अथवा इजा होऊ शकेल आणि त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय संहितेचे कलम **२८१** खाली शिक्षापात्र असलेले आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

दुसरे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमुद वाहन मानवी जिवीतास अथवा इतरांचे वैयक्तीक सुरक्षेस धोका निर्माण हाईल अशा प्रकारे हयगयीने व निष्काळजीपणाने वरील प्रमाणे वाहन चालवुन सदरील वाहनाने वर नमुद स्कुटरला ठोस मारुन अपघात केला व सदरील अपघातामध्ये

मोटारसायकलस्वार यांना जखमी केले आणि त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय संहितेचे कलम **१२५(अ)** खाली शिक्षापात्र असलेले आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तिसरे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमुद वाहन मानवी जिवीतास अथवा इतरांचे वैयक्तीक सुरक्षेस धोका निर्माण हाईल अशा प्रकारे हयगयीने व निष्काळजीपणाने सदरील वाहनाने वर नमुद मोटारसायकलला ठोस मारुन अपघात केला व सदरील अपघातामध्ये स्कुटर स्वार यांना गंभीर जखमी केले आणि त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय संहितेचे कलम **१२५(ब)** खाली शिक्षापात्र असलेले आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

चौथे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमुद वाहन मानवी जिवीतास अथवा इतरांचे वैयक्तीक सुरक्षेस धोका निर्माण हाईल अशा प्रकारे हयगयीने व निष्काळजीपणाने वरील प्रमाणे वाहन चालवुन वर नमुद मोटारसायकलला ठोस देऊन अपघात केला व सदरील वाहनांचे नुकसान केले आणि त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय संहितेचे कलम **३२४(४)** खाली शिक्षापात्र असलेले आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

पाचवे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी संबंधीत रस्त्याचे परिस्थितीचा विचार न करता लोकांना धोकादायक ठरेल अशा वेगाने अथवा अशा पध्दतीने वर नमुद मोटारसायकल वाहन चालविले आणि त्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१८४** खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

13/02/2026

सहावे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी अपघात

झालेनंतर तुम्ही घटनेचे परिस्थितीतीची माहिती तसेच वरील प्रमाणे जखमीस वैद्यकीय उपचार मिळणेकरिता तुम्ही कोणतेही उपाय योजना का केली नाही, याची माहिती तुम्ही जवळचे पोलीस स्टेशनला शक्य तेवढया लवकर दिली नाही आणि त्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१३४** दंडनीय मोटार वाहन कायद्याचे कलम **१७७** खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

सातवे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी अपघात झालेनंतर तुम्ही घटनेचे परिस्थितीतीची माहिती तसेच वरील प्रमाणे जखमीस वैद्यकीय उपचार मिळणेकरिता तुम्ही कोणतेही उपाय योजना का केली नाही, याची माहिती तुम्ही जवळचे पोलीस स्टेशनला शक्य तेवढया लवकर दिली नाही आणि त्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१३४** दंडनीय मोटार वाहन कायद्याचे कलम **१८७** खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आठवे असे की, तुम्ही वरील दिवशी, तारखेस, वेळी व ठिकाणी संबंधीत रस्त्याचे परिस्थितीचा विचार न करता लोकांना धोकादायक ठरेल अशा वेगाने अथवा अशा पध्दतीने वर नमुद वाहन, वैध विमा नसतांना चालविले आणि त्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१४६/१९६** खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देश देतो की, तुमची उपरोक्त आरोपांकरिता हया न्यायालयाद्वारे न्याय चौकशी करणेत यावी.

13/02/2026

**(धनंजय एस. देवरे)**

दिनांक १३.०२.२०२६

नवापुर

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २,

नवापुर.

## प्रमाणपत्र

वरील दोषारोप आरोपीस त्यांचे मातृभाषेत वाचून दाखविणेत आला व समजावून सांगणेत आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. आरोपीचे म्हणणे स्वतंत्ररित्या नोंदविणेत आले आहे.

दिनांक १३.०२.२०२६

नवापुर

**(धनंजय एस. देवरे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २,

नवापुर.